Impact Factor 4.574

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Journal

VOL-V ISSUE-VI June 2018

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# रूब्रिक : एक मूल्यमापन साधन

**डॉ. सुरेंद्र चंद्रकांत हेरकळ,**
एम. आय. टी. संत ज्ञानेश्वर बी. एड्.
कॉलेज, आळंदी, पुणे.

**प्रस्तावना :**

विविध तंत्रांच्या मार्फत विद्यार्थ्यांमध्ये होणारे बदल हे उद्दिष्टांरूपी होत आहे की नाही हे बघण्यासाठी श्रेणी कोणती व कधी द्यावयाची किंवा किती गुण कशासाठी द्यावे हे ठरवावे लागते आणि हे ठरवत असताना त्या प्रश्नाला योग्य जे उत्तर असेल किंवा विद्यार्थ्यांमधला जो योग्य बदल असेल तो उत्तम आहे असं ज्याला म्हणावयचं ते कशाला म्हणायचं ते ठरवावे लागते.

**संकल्पना व व्याख्या :**

जेव्हा उत्तम ठरविता येते त्याच्यासाठी त्याच्या ज्या काही खूणा बदलाच्या असतील त्या लिहाव्या लागतील. त्या नुसत्याच मनात आहेत असे म्हणून चालणार नाही कारण त्याच्यामध्ये संदिग्धता राहिल. म्हणून उत्तम खूणा प्रतिसादाच्या कोणत्या, ते नाही आलं तर त्याच्यापेक्षा कमी येणारे काय? म्हणजे ज्याला सामान्य कामगीरी असं म्हणता येईल आणि ते ही येणार नाही त्याला असमाधानकारक असं म्हणू. यातील उत्तम, मध्यम आणि असमाधानकारक कामगिरी ठरविण्यासाठीची जी प्रक्रिया करावी लागते ती प्रक्रिया आपल्याला तंत्रामधून मोजायचा जो वर्तन बदल आहे त्याच्यासाठी ते एक मोजपट्टी (Rubrick) देते आणि या मोजपट्टीसाठीची प्रक्रिया करावी लागते ती प्रक्रिया कशी करावी लागते, याचे वर्णन हे पुढीलप्रमाणे;

" रूब्रिक म्हणजे विशिष्ट विद्यार्थी गटाची विशिष्ट क्षेत्रातील गुणवत्ता मोजून त्यांना श्रेणी देण्यासाठी आधारभूत ठरेल अशी मोजपट्टी तयार करण्याचे तंत्र."

- विद्यार्थ्यांमध्ये होणारे बदल अपेक्षित दिशेने होत आहेत का हे पाहण्यासाठी काही 'मोजपट्टी' करायला हवी, ती म्हणजे रूब्रिक होय.
- श्रेणी देण्यासाठी वा गुणांच्या भाशेत त्याचे रूपांतर करण्यासाठी या पट्टीची गरज आहे.

**रूब्रिक बनविण्यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे**

१. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनात तंत्रे वापरतो, त्या प्रत्येक तंत्राने नेमके कोणते क्षेत्र (भावात्मक, बोधात्मक व क्रियात्मक) त्याचा किती भाग, कोणती उद्दिष्टे तपासणार आहे, हे निश्चित करायला हवे.
२. ही उद्दिष्टे विद्यार्थ्यांना आत्मसात झाली की नाही, किती प्रमाणात झाली, हे ठरविण्यासाठी उद्दिष्टे पूणपणे आत्मसात झाली तर विद्यार्थी कोणत्या गोष्टी करेल याचे वर्णन करणारी विधाने लिहून काढणे.
३. ही विधाने निरीक्षण करता येण्याजोगी हवीत.
४. विधानांचे उत्तम,सामान्य व असमाधानकारक वर्तन दर्षविणारे असे गट तयार करावेत.

५. सहशालेय कार्यक्रमाची उद्दिष्टे ठरविताना शिक्षकांनी अशी विधाने प्रत्येक सहशालेय कार्यक्रमासाठी तयार करावीत.
६. या विधानात इयत्तेनुसार आवश्यक ते फरक येतील.
७. विद्यार्थ्यांशी चर्चा करून उत्तम, साधारण व असमाधानकारक कामगीरीचे वर्णन त्यांच्याकडून काढून घ्यावे.

**रूब्रिकचे फायदे**

१. रूब्रिकच्या आधारे विद्यार्थी स्वत:च्या आणि एकमेकांच्या कामगीरीचे मोजमाप करतील.
२. आपल्याला कोणती श्रेणी मिळाली व ती का मिळाली, याचे स्वयंमूल्यमापन करण्याची संधी मुलांना देणे शक्य आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना कमी समाधानकारक किंवा उत्तम का याचे उत्तर त्यांना स्वत:च मिळते.
३. स्वत:च्या कामाकडे स्वत:च पाहण्याची सवय विद्यार्थ्यांना लागते.
४. विद्यार्थ्यांना स्वत: प्रयत्न केले की पुढे जावू शकतो याची जाणीव होते.
५. शिक्षकांनाही मूल कमी किंवा उत्तम का याचे पृथक्करण करून स्वत:ला, मुलांना व पालकांना मार्गदर्शन करता येते.
६. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाचा हेतू साध्य करण्यासाठी आवश्यक आहे.
७. रूब्रिक प्रत्यक्षामध्ये जेव्हा शिक्षक तयार करतील त्यावेळेला,
   - मुलाला स्वबदल करताना कोणत्या अडचणी आल्या.
   - शिक्षकाला मुलाला हे का आले नाही, याचे पृथ्थकरण करून त्याला स्वत:च्या अध्यापनामध्ये बदल करता येईल.
   - पालकाच्या संबंधित मुलाच्या विकससंदर्भात काही प्रश्न असणार आहेत. त्यासंबंधी पालकांना ही काही प्रत्याभरण देता येईल.

**रूब्रिकचे उदाहरण**

इयत्ता ७ वी विषय : मराठी निबंध लेखन उपघटक : वर्णनात्मक निबंध

- शिक्षकांनी वर्गात पाठयपुस्तकातील पाठांच्या आधारे आणि इतर वर्णनात्मक निबंधाच्या आधारे वर्णनात्मक निबंधाची वैशिष्टये वर्गात मुलांच्या ध्यानात आणून दिली आहेत. आता मुलांनी स्वत: वर्णनात्मक निबंध लिहायचा आहे.
- मुलांबरोबर वर्णनात्मक निबंधाची वैशिष्टये, त्यांच्या मते त्यात कोणत्या गोष्टी आल्या पाहिजेत, उत्तम वर्णनात्मक निबंधात काय हवे, या सा—याची चर्चा झाली आहे.
- त्यांच्या तयारीस एक आठवडा दिला आहे. आता सांगितलेल्या दिवशी मराठीच्या तासाला मुलांनी दिलेल्या विषयावर निबंध लिहावयाचा आहे.

विषय : मराठी घटक : निबंध लेखन उपघटक : वर्णनात्मक निबंध

निबंधाचा विषय : पावसाळयातील एक दिवस

वेळ : ३५ मिनिटे स्थळ : वर्ग

**नमुना रूब्रिक**

| | उत्तम (A) | मध्यम (B) | असमाधानकारक (C) |
|---|---|---|---|
| **प्रस्तावना** | १. आकर्षक सुरूवात<br>२. पुढील मजकुराची पूर्वसूचना<br>३. सुगम रचना | १.सरळ सुरूवात<br>२. आकर्षकतेचा अभाव | १.एकदम वर्णनाला हात |
| **आशय, तथ्य, व्याप्ती, खोली** | १. आशयात प्रत्यक्ष स्वानुभाव,<br>२. अनुभवाची विश्वासनियता,<br>३. सामान्यीकरणाची संभाव्यता,<br>४. सुविहित परिच्छेद मांडणी | १.स्वानुभव नाही<br>२. सामान्यीकरण संभाव्यता नाही. | १.वरचेवर तपशील |
| **शैली, व्याकरण, शुध्दलेखन** | १. विनोदाचा स्पर्श<br>२. विशेषणांचा समर्थक वापर<br>३. वाक्यरचनेचा योग्य वापर<br>४. व्याकरण शुध्दता | १. तर्कसंगत विधाने<br>२. शुध्दलेखन निर्दोश | १. तुटक रचना<br>२. शुध्दलेखन दोष |
| **शेवट** | ज्या अंगाने विशय प्रवेश केला असेल त्याला संगत शेवट असणे, विनोद अंगाने सुरूवात असेल तर शेवट त्या त—हेनेच असेल. | शेवट करण्याचा प्रयत्न | एकदम लिखाण थांबणे. |

**संदर्भ :**


1. https://en.wikipedia.org/wiki/Rubric_(academic)
2. https://resources.depaul.edu/teaching-commons/teaching-guides/feedback-grading/rubrics/Pages/types-of-rubrics.aspx
3. https://www.google.co.in/search?q=rubric+examples&sa=X&dcr=0&tbm=isch&tbo=u&source=univ&ved=0ahUKEwjnpZCxsovYAhVThrwKHbbWB8IQsAQIJQ&biw=1366&bih=636#imgrc=b-qAnpjCaj4ciM:
4. https://k6educators.about.com
5. https://www.indiana.edu/~academy/firstPrinciples/